UGC Approved Referred Journal Jr.No.62759

Special Issue February 2018

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

## International Multilingual Research Journal

Jawahar Education Society's

## Vaidyanath College

Parli-Vaijnath, Dist.Beed (Maharashtra)

**Reaccredited by NAAC with 'B' Grade (CGPA2.53)**

Affiliated to Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.

## National Seminar
on
# Disaster Management

February,2018

**Organized By**

Department of Public Administration & Geography

**Chief Editor**

**Dr.Ippar R.K.**

Principal, Vaidyanath College & Senate Member,
Dr.BAMU,Aurangabad

**Editor**

**Dr.J.B.Kangane**
Head Dept. of Public Administration

**Dr.V.L.Phad**
Head Dept. of Geography

155

Scanned with OKEN Scanner

27) 'ओखी' चक्रीवादळ : एक भौगोलीक अभ्यास
प्रा.डॉ.व्ही.एल.फड & प्रा.संजय रणखांबे,परळी वै. || 99

28) आपत्ती व्यवस्थापन : लोकसहभाग व जनजागृती
प्रा.डॉ.जोगदंड संजय पांडूरंग, जि.बीड || 103

29) आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज
प्रा. इरलापल्ले पल्लवी भागवतराव, जि.बीड || 104

30) आपत्ती व्यवस्थापनाची गरज व उपाय योजना
डॉ. जे. बी. कांगणे, जि. बीड || 106

31) आपत्ती व्यवस्थापन लोकसहभाग व जनजागृती
प्रा. अशोक नारायण गायकवाड, जि. लातूर || 110

32) नैसर्गिक आपत्तीवर नियोजन आणि अंमलबजावणी
प्रा. पवळे अनुराधा रोहिदास , लातूर || 111

33) नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तीची कारणे, परिणाम व उपाय !
प्रा.बालाजी आर. गुरूडे, परभणी || 113

34) आपत्ती व्यवस्थापन आणि प्रशासन
प्रा.डॉ.बन वशिष्ठ गणपतराव, जि.लातूर || 118

35) भुकंप एक नैसर्गिक आपत्ती — विशेष संदर्भ किल्लारी
प्रा. डॉ. बी.के. शेप, परळी वै. || 125

36) नैसर्गिक आपत्ती नियोजन आणि अंमलबजावणी : विश्लेषणात्मक अभ्यास
डॉ. प्रमोद चव्हाण. & प्रा. षाजी सहदेवन., जालना || 123

37) शाळा-महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाची गरज - एक अभ्यास
प्रा. डॉ. दयानंद उजळंबे , जि.परभणी || 125

38) अवर्षण : आपत्ती एक अभ्यास
प्रा. डॉ. व्हि. एल फड & प्रा. एम.आर. चाटे, परळी वै. || 128

39) आपत्ती प्रशासनात जिल्हा प्रशासनाची भूमिका
प्रा. चावरे एम. व्ही., ता. जि. लातूर || 131

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



156

Scanned with OKEN Scanner

अभिप्रेत आहे.

1) आपत्ती व्यवस्थापन काळात नागरिकांनी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन केले पाहिजे.

2) नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन काळात प्रशासनासह आपले वर्तन योग्य ठेवले पाहिजे.

3) पुनर्वसन किंवा तत्सम योजनांमध्ये आपणहून लोकांनी सहभाग नोंदविला पाहिजे.

4) नागरिकांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 नूसार आपले वर्तन ठेवले पाहिजे.

5) नागरिकांनी प्रशासनाकडून दिले जाणारे आपत्ती कालीन प्रशिक्षण घेतले पाहिजे.

6) आपत्ती व्यवस्थापन काळात लोकांनी प्रशासनाला वर्तमान परिस्थिती संदर्भात माहिती दिली पाहिजे.

7) प्रशासकीय नियंत्रण कक्षांशी संपर्क नागरिकांनी तात्काळ केला पाहिजे.

अशा पध्दतीने लोकांनी आपत्ती काळात प्रशासनाला सहकार्य केले पाहिजे. राष्ट्राच्या विकासासाठी जेवढे हे महत्वाचे आहे, तेवढेच नागरिकांच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापनात लोकांचा सहभाग यावरच पूर्णपणे प्रशासन अवलंबून असते असे आपत्ती व्यवस्थापन तज्ञ डॉ. संजय चाकणे यांनी म्हटलेले आहे. नागरिकांकडून आपत्ती व्यवस्थापन काळात सक्रिय सहभाग मिळवताना तो संस्थात्मक दृष्टिकोनातून मिळणे उचित ठरते. आंध प्रदेशातील काही वादळ प्रवण क्षेत्रांमध्ये ग्रामकृती दल उभे केलेली आहेत. नागरिकांच्या नुकसानीची तीव्रता कशी कमी करता येईल, आपत्तग्रस्त लोकांना साधने कशी पुरवावीत तसेच आपत्त काळात ावाची प्रमुख यंत्रणा म्हणून काम करताना ही दले अग्रेसर असतात.

आपत्ती प्रशासनात नागरिक, स्वयंसेवी संस्था, शासन, प्रशासन, समाज यांची सामुदायिक भुमिका अत्यंत महत्वाची असते. मात्र या भूमिकेत नागरिक हा प्राथमिक घटक आहे. आपत्तीमध्ये पर्यावरणाची हानी होते, पण पर्यावरणाचे चक्र अविरत आहे. आपत्तीमध्ये एकेक माणसाची, नागरिकांची झालेली जिवीत व शारीरिक हानी कशानेही भरुन येत नाही. नागरिक हा आपत्तीचा सर्वात मोठा बळी आहे, म्हणून आपत्ती निवारणात नागरिकांची भूमिका इतर कोणत्याही घटकाहून अधिक महत्वाची आहे.

**संदर्भ सूची :**

1) आपत्ती निवारण - डॉ. पठारे संभाजी

2) वृत्तीबध्द आपत्ती व्यवस्थापन - कर्नल मराठे पी. पी.

3) लोकप्रशासनातील नवप्रवाह - डॉ. पोहेकर प्रीती

4) नवलोक प्रशासन - डॉ. गाडेकर एस.एस.

5) भारतीय प्रशासन व्यवस्था - डॉ. गौतम वीर

29

# आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज

**प्रा. इरलापल्ले पल्लवी भागवतराव**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा जि.बीड.

*********

**सारांश :**

आजच्या आधुनिक मानसाला दुहेरी समस्यांना सामोरे जावे लागते. एक म्हणजे निसर्ग निर्मित आपत्ती व दुसरी मानवनिर्मित आपत्ती अशा वेळी विभन्न पायाभूत नियोजनाची आवश्यकता असते. मनुष्याने स्वत:च्या सुखसोयीसाठी ज्या वस्तू आणि साधनांची निर्मिती केली आहे त्याचा वापर अधिक प्रमाणात होत असल्यामुळे निसर्गावर प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या प्रभाव दिसून येतो त्यामुळे मानवाने मानवासाठी निर्माण केलेल्या कृत्रिम आपत्तीला समोरे जावे लागत आहे. म्हणजेच मनुष्याला आता नैसर्गिक आपत्तीबरोबरच मानवनिर्मित अपत्तीलाही तोंड द्यावे लागत आहे. यामध्ये अद्यावत तंत्रज्ञानाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. गूगल सर्च इंजिन, जी.आय.एस.मॅपींग, सॅटेलाईट यांच्या अधारे नैसर्गिक व जिवीत हानी व वित्तहानी आपण टाळू शकतो.

**प्रास्ताविक:**

मानवाच्या गरजा अमर्याद झाल्या आहेत. या मर्यादांची पूर्तता करण्यासाठी नवनवीन संशोधन समोर येत आहे. या संशोधनाचा केवळ तात्पुतरता उपयोगत होतो. मात्र भविष्यात मोठमोठ्या संकटांना सामोरे जाणे आपणाला अवघड होते. उत्तराखंड येथील पूर परिस्थीती आपण अनुभवलेली आहे आणि या परिस्थितीला मनुष्यच जबाबदार आहे.

आपत्ती ही कधी सांगून येत नाही. त्यामुळे आपत्तीला तोंड देण्यासाठी मनुष्याला सदैव तत्पर रहावे लागते. ज्या प्रमाणे एखादी कौटुंबिक आपत्ती अचानक उद्भवते त्याच प्रमाणे मानवनिर्मित कृत्रिम आपत्ती आणि नैसर्गिक आपत्ती ही अचानक उद्भवू शकते. चआपत्ती म्हणजे अशी घटना जिच्यामुळे प्रचंड हानी होते व जिला निसर्ग आणि मानव हे दोनच घटक जबाबदार असतात. आपत्तीमुळे जे नुकसान होते ते कधीच भरवून काढता येत नाही. तेथील मालमत्तेचे तर नुकसान होतेच पण तेथील समाज मनावर देखील दिर्घकालीन परिणाम होत

**आपत्तीचा उदय:**

समाजात जोपर्यंत भेदभाव राहिल तोपर्यंत समाज नेहमीच आपत्ती प्रवण राहिल. आपत्ती ही जरी अचानक येत असली तरी प्रत्येक आपत्ती अचानक येत नसते. ज्या अनियोजीत पध्दतीने विकास होत असतो त्यातच ती दडलेली असते. चुकीच्या पध्दतीने झालेले नागरीकरण आणि त्यातून उभी राहिलेली बकाल शहरे, नैसर्गिक स्त्रोतांचे विषम वाटप, त्याचा अमर्याद वापर आणि दुरूपयोग व यातून वाढणारी सामाजिक विषमता, दारिद्र्य आपत्तीला आमंत्रण देत असतात.[२] आपत्तीचे दुष्परिणाम टाळण्यासाठी पर्यावरणाबाबत संवेदनशील आणि चिरंतन विचाराचे प्रारूप समोर ठेऊन काम केले पाहिजे.

**आपत्ती व्यवस्थापनाचे टप्पे :**

**१) आपत्तीपूर्व व्यवस्थापन :**

पहिल्या टप्प्यात आपत्तीपूर्व व्यवस्थापनाचा समावेश होतो. यामध्ये प्रशिक्षण, जनजागृती, उपक्रम, यंत्रणांचा सराव आणि प्रात्यक्षिके यांचा समावेश होतो. भूकंप, ज्वालामुखी यासारख्या अचानक उद्भवणाज्या आपत्ती असून दरड कोसळणे, पूर येणे या पूर्व चिन्ह दाखणाज्या आपत्ती आहेत. अशा परिस्थितीत संभाव्य जागा ओळखून त्यानुसार त्या विशिष्ट ठिकाणी कोणती व्यवस्था करणे गरजेची आहे हे ठरवता येते.

**२) आपत्ती प्रसंगी व्यवस्थापन :**

हा आपत्ती व्यवस्थापनातील दुसरा महत्त्वाचा टप्पा आहे. प्रत्यक्ष आपत्कालीन प्रसंगी मदत यंत्रणेत समन्वय राखणे याचा यात समावेश होतो. मात्र यासाठी कामात सुसूत्रता, सुलभता, क्रियाशीलता हवी. तसेच पारदर्शक आणि सक्षम मनुष्यबळही हवे. आपत्तीप्रसंगी आपत्ती ग्रस्तांना वाचविण्यासाठी असणाज्या सुवर्ण क्षणामध्ये व्यक्ती प्रशिक्षित असल्यास आपला जीव वाचवू शकतो. ट्रेचर कसा बनवायचा, दोज्याला विविध प्रकारच्या गाठी बांधून आपत्कालीन परिस्थितीत स्वत: बरोबर इतरांची सुटका करण्याचे कार्य कसे करावे, उपलब्ध साधनातून स्वच्छ व निर्जंतुक बॅण्डेज कसे तयार करायचे आणि त्याचा वापर कसा करावा. रक्तस्त्राव कशा पध्दतीने थांबवू शकतो या संपूर्ण गोष्टीचे ज्ञान असणारा उमेदवारच अशा प्रसंगाला धैर्याने तोंड देवू शकतो.[३]

**३) आपत्ती उत्तर व्यवस्थापन :**

हा आपत्ती व्यवस्थापनातील तिसरा महत्त्वाचा मुद्दा आहे. यामध्ये आपत्तीनंतर करावे लागणारे मदत कार्य नियंत्रित करणे, मदत आणि पुनर्वसन योजनेची अमंलबजावणी करणे यांचा समावेश होतो. आपत्तीनंतर केवळ मालमत्तेचीच हानी झालेली नसते तर मनुष्य हानी बरोबरच जिवीत व्यक्तीलाही मानसिक धक्का बसलेला असतो. रोगराई पसरू न देता मृतदेहाची विल्हेवाट लावणे, अन्नधान्य पुरवठा करणे, व्यक्तींचे स्थलांतर करणे इत्यादीमध्ये प्रशासकीय यंत्रणेची भूमिका महत्त्वाची असते. राज्यात ऐनवेळी ओढावलेल्या आपत्ती दरम्यान वरील सर्व यंत्रणा अचानक कोलमडून पडतात.

**आपत्ती व्यवस्थापनातील यंत्रणा :**

राष्ट्रीय पातळीवर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण असते. त्यांचे अध्यक्ष पंतप्रधान असतात. राज्य पातळीवर याचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतात व जिल्हा पातळीवर याचे अध्यक्ष जिल्हाधिकारी असतात. शहर पातळीवर शहर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण असते. त्याचे अध्यक्ष महापालिकेचे आयुक्त असतात. आपत्ती व्यवस्थापनाशी सर्वच विभागाचा संबंध येतो. यामध्ये प्रामुख्याने संपर्क यंत्रणा, पोलीस सुरक्षा, अग्निशामक, आरोग्य व वैद्यकीय, अभियांत्रिकी, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, सेना दल, जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष इत्यादी विभागांचा समावेश होतो.

**आपत्ती व्यवस्थापनात अद्यावत तंत्रज्ञानाची भूमिका :**

गुगलसारख्या सर्च इंजिनवर ठिकाणांचा विकास आराखडा उपलब्ध असायला पाहिजे. त्यामुळे ज्या ठिकाणी अतिक्रमण आहे हे पाहून वेळीच इलाज होऊ शकतो. तसेच जनतेला आराखडा दिसला असता, जनताही जागरूक होते. कारण अनेकवेळा घर खरेदी करताना नागरिकांना ते नदीपात्रात ते नाल्यावर आहेत हे माहिती नसते. त्यामुळे त्यांची जिवीत व आर्थिक हानी मोठ्या प्रमाणावर होते ही हानी आपण टाळू शकतो.

जी.आय.एस. मॅपींग ही आपतकालीन स्थितीमध्ये उपयोगी असणारी एक महत्त्वाची यंत्रणा आहे. या माध्यमातून सर्वे व इंडियाचे नकाशे सार्वजनिकरित्या प्रसिध्द झाले पाहिजेत. यामुळे नदी, नाले, रस्ते याठिकाणी झालेले अतिक्रमण तात्काळ कळू शकते.[४] सॅटेलाईटवरून मिळणाज्या प्रतिमांचा जास्त वापर करून मदतीची गरज लक्षात येऊ शकते. वाहणारे पाणी कुठे व कसे आडवता येईल याचा विचारही सॅटेलाईट इमेजमुळे करता येतो. इस्त्रोशी योग्य संपर्क ठेवल्यास घटना घडल्यापासून २४ तासाच्या आत आपल्याला पाहिजे असलेल्या घटनेच्या प्रतिमा मिळू शकतात.

सॅटेलाईटद्वारे वैद्यकीय अत्यावश्यक सेवांची माहिती आपत्तीग्रस्त भागातील मेडीकल कॅम्पपर्यंत पोहचली जावू शकते. समुद्रातील तरंगत्या सिग्नल यंत्रणेमुळे त्सुनामीच्या सुचना सॅटेलाईटद्वारे आपणापर्यंत पोहचतात व जिवीत हानी टाळली जाऊ शकते. समुद्रात लावलेल्या सेन्सरमुळे भूकंप झाल्यानंतर समुद्रातील हालचालीवर नजर ठेवली जाऊ शकते. वायरलेस संवाद साधून टी.व्ही., इंटरनेट, रेडिओद्वारे आपत्तीची माहिती मिळते. नैसर्गिक आपत्तीच्या काळात



Scanned with OKEN Scanner

संवादासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा कोलमडलेल्या असतात अशावेळी सॅटेलाईट उपयोगी पडते.

भारतामध्ये आपत्कालीन व्यवस्थापनांचे खास प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची अभ्यासक्रमाचा वनवा आहे. प्रसारमाध्यमे, वैज्ञानिक विभाग, स्वयंसेवी संस्था, सशस्त्र दल, व्यवसायिक, सर्वसामान्य नागरिक यांना एकत्र करून प्रशिक्षणाबरोबरच विविध शासकीय यंत्रणामधील समन्वय यादृष्टीने आपण बरेच काही करू शकतो. तसेच शाळां-महाविद्यालयामध्ये तात्पुरत्या स्वरूपाचे प्रशिक्षण दिल्यास, विद्यापीठ स्तरावर अशा अभ्यासक्रमाचे नियोजन आखल्यास भविष्यात भारतीय जनमानस प्रशिक्षित होईल. त्यांच्यात प्रसंगावधानता येईल आणि ही आज काळाची गरज आहे.

संदर्भ ग्रंथ :

१. Maharashtra State Disaster Management Plan-२०१५.

२. SDMP, Gujrat.

३. प्रा. भालेराव जे.के. व प्रा. बी.जी. जगताप (२०१०), प्रगत लोकप्रशासन, अनुराधा प्रकाशन, पैठण-२०१०.

४. दै. लोकमत, दि. २० जुलै २०१४.

❑❑❑

30

# आपत्ती व्यवस्थापनाची गरज व उपाय योजना

डॉ. जे. बी. कांगणे
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
वैद्यनाथ कॉलेज, ता. परळी वैजनाथ जि. बीड

**********

प्रस्तावना :

प्रत्येक नागरिकास त्या त्या देशात वास्तव्य करीत असताना त्याची सुरक्षितता, त्यास जगण्याचा हक्क आणि राष्ट्रीय एकात्मता याची हमी असावी लागते. तेथील देशाच्या राज्य घटनेनुसार व्यक्तीला त्याचे जीवन व मालमत्ता सुरक्षित राखता येते शासन याविषयी व्यक्तीला कायदयानुसार हमी देते. आपत्ती आल्यास तिचा सामना करण्याची क्षमता व्यक्तीला असली तर आपत्तीची तीव्रता मंद करता येऊ शकते मात्र त्यासाठी नियोजन आणि त्याचे व्यवस्थापन योग्य प्रकारे असावे लागते.

आपत्तीमुळे मालमत्तेची प्रचंड हानी होत असते त्यानुसार समाजात आर्थिक, सामाजिक,राजकीय व सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात परिणाम दिसून येतात. त्सुनांमी, भोपांळची वायूगळती अशा आपत्तीमुळे अजूनही लोक सावरलेले नाहीत. यासाठी आपत्तीचे निवारण करणे गरजेचे असते. त्यासाठी स्थानिक,राज्य व राष्ट्रीय पातळीवर ठोस प्रयत्न करणे आवश्यक असते. संकट हा एक धोका असतो त्यामुळे आपत्ती निर्माण होत असते. आपत्ती हया दोन प्रकारच्या असतात मानवनिर्मित व निसर्गनिर्मित आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ यात आपत्तीची व्याख्या देण्यात आली आहे. ती व्याख्या पुढीलप्रमाणे — अचानक आलेले संकट, उत्पात अथवा दुर्घटना कोणत्याही क्षेत्रात घडली असुन ती मानवनिर्मित असो वा नैसार्गिक असो, ज्या घटनेव्दारे व्यापक प्रमाणात





Scanned with OKEN Scanner